।। सा विद्या या विमुक्तये ।।

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

**Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade**

# EXAMINATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**
boeeoffice@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/संपवमूमं/२०२२-२३/ ८०३ दिनांक : ०४/०८/२०२२

प्रति,
उपकुलसचिव/सहायक कुलसचिव
कार्यालयीन अधिक्षक (कला,वाणिज्य,विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम व संगणक कक्ष)
परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : उन्हाळी २०२२ सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या एकत्रित गुणदानाबाबत.**

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, दि. ३०/०७/२०२२ रोजी संपन्न झालेल्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ०२-१८/२०२२ नुसार उन्हाळी २०२२ च्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया ऑफलाईन पध्दतीने पेन ॲन्ड पेपरव्दारे दीर्घोत्तरी पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे उन्हाळी २०२२ परीक्षांचे विद्यापीठ परिसर संकुलातील व विद्यापीठ उपपरिसरातील अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले आहेत. कोवीड-१९ च्या बदललेल्या परिस्थीतीत पेन व पेपर या पध्दतीने उन्हाळी २०२२ हि पहिलीच परीक्षा असल्यामुळे एकुण परीक्षेच्या निकालाचा विचार करता मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने याबाबत खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कार्यवाही/अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

१. उन्हाळी २०२२ केवळ याच परीक्षेतील सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व विद्याशाखांच्या व सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षेतील परीक्षार्थ्यांचे अंतर्गतगुण, प्रात्याक्षिक व लेखी परीक्षेतील गुण एकत्र करुन निकाल जाहीर करण्यासाठी मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.
२. अंर्तगत, प्रात्याक्षिक व लेखी परीक्षेतील गुणांचे एकत्रिकरण करुन त्या त्या अभ्यासक्रमांच्या ठरलेल्या टक्केवारीमध्ये बदल न करता निकाल जाहीर करण्यात यावेत.सदर धोरणात्मक निर्णय केवळ उन्हाळी २०२२ परीक्षेपुरतेच हे नियम लागु राहतील, आगामी परीक्षेत सदर नियम लागु राहणार नाहीत.
३. जे परीक्षार्थी ज्या संबंधीत सत्राच्या लेखी व प्रात्याक्षिक उन्हाळी २०२२ च्या अंतिम सत्राच्या परीक्षेकरीता बसलेले आहेत त्यांनाच हा नियम लागु राहील व जे परीक्षार्थी लेखी परीक्षेच्या अंतिम सत्रास अनुपस्थित

आहेत त्यांना  याचा लाभ मिळणार नाही. उन्हाळी २०२२ च्या लेखी परीक्षेत परीक्षार्थी उपस्थित असणे अनिवार्यच राहील.

४. सदर सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थ्यांचे नव्याने कोणत्याही प्रकारचे प्रात्याक्षिक व अंतर्गतगुण येथुन पुढे उन्हाळी २०२२ च्या परीक्षेचे उशिराने स्विकारण्यात येवु नयेत.

५. या निर्णयाच्या अनुषंगाने जो परीक्षार्थी उत्तीर्ण होईल अशा सर्व परीक्षार्थ्यांस झालेल्या निर्णयाप्रमाणे निकाल/गुणपत्रक देण्यात यावेत.

६. सद्यस्थितीत उन्हाळी २०२२ च्या परीक्षेचे विद्यापीठ परिसर,उपपरिसर व संलग्नीत महाविद्यालयांचे जे  निकाल जाहीर झालेले  आहेत व गुणपत्रिकांचे वाटप झालेले आहे असे सर्व मुळ गुणपत्रक परत घेवुन अंतर्गत, प्रात्याक्षीक व लेखी गुणांच्या एकत्रिकरणाच्या वरील अ.क्र. ०२ च्या उक्त नियमानुसार सुधारीत गुणपत्रक देण्यात यावेत. यामध्ये उत्तीर्ण व अनुत्तीर्ण अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांचे गुणपत्रक सुधारीत पध्दतीने देण्यात यावेत,जेणेकरुन उपरोक्त निर्णयाचा समान समावेशक अंतर्भाव असणार आहे.

७. सदरचा धोरणात्मक निर्णय हा केवळ उन्हाळी २०२२ परीक्षेपुरताच मर्यादित राहील, आगामी परीक्षेत हा नियम लागु होणार नाही.

८. बी.कॉम अभ्यासक्रमांचे संलग्नीत महाविद्यालयांचे निकाल या नियमाच्या अनुषंगानेच जाहीर करण्यात आलेले आहेत व पुढील सर्व निकाल याच पध्दतीने जाहीर करण्यात येतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सबब,  उपरोक्त मा. परीक्षा व मूल्यमान मंडळाच्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही/अंमलबजावणी करण्यात यावी.

**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव  अग्रेषीत :**
मा.कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र- कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, सर्व संकुले, विद्यापीठ परिसर व उपपरिसर, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.